# प्रेस नोट ता. २७/०९/२०२२ पोलीस स्टेशन – चिंचवड

## वर्षोनवर्ष पोलीस ठाण्यात धुळखात पडलेल्या वाहनांच्या १९० मुळ मालकांचा चिंचवड पोलीस स्टेशन आणि श्री राम उदावंत परंदवाडी ता. मावळ यांनी लावला शोध

--- ०० --

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशनच्या आवारात वर्षोनवर्षे धुळखात पडलेल्या वाहनांची तात्काळ निर्गती करणेबाबत मा. श्री. अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आदेशीत केल्याने त्या अनुषंगाने श्री कृष्णदेव खराडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी चिंचवड पोलीस स्टेशन कडील मुद्देमाल कारकून व इतर अंमलदार यांना मावळ तालुक्यातील परंदवाडी येथील श्री राम उदावंत यांचे मदतीने सदर वाहनांची निर्गती करणे संदर्भात सुचना दिल्या.

त्याअनुषंगाने पोलीस ठाण्याच्या आवारातील ३०० हुन अधिक वाहने वर्षोनवर्षे धुळखात पडलेल्या बेवारस आणि विविध गुन्ह्यातील वाहन मालकांचा शोध लावण्यात चिंचवड पोलीस आणि मावळ तालुक्यातील परंदवाडी येथील श्री राम उदावंत यांना यश आले असून त्यांनी १९० बेवारस आणि विविध गुन्ह्यातील वाहनांच्या मालकांचा शोध लावला आहे. शोध लावलेल्या वाहन मालकांनी आवश्यक ते कागदपत्रांची पुर्तता आणि ओळख पटवुन आपली वाहने ताब्यात घेण्याचे आवाहान चिंचवड पोलीसांकडुन करण्यात आले आहे.

न्यायालयीन प्रक्रीया तसेच विविध जुन्या गुन्ह्यातील वाहनाचे मालक मिळुन येत नसल्यामुळे ती वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात पडुन असतात, परिणामी पोलीस ठाण्याच्या सुशोभीकरण करण्यास बाधानिर्माण होउन पोलीस ठाण्याला बकालपणा प्राप्त होतो. ही बाब लक्षात आल्यानंतर चिंचवड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक कृष्णदेव खराडे यांनी पुढाकार घेवुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अशा वाहनांच्या मुळ मालकांचा शोध घेवुन ती वाहने मालकांच्या ताब्यात देण्याचा संकल्प केला आहे. पोलीसांनी त्यांच्या टिमचे व मावळ भागातील परंदवाडी येथील श्री राम उदावंत यांच्या टिमचे सहायाने सन २००८ पासुन पोलीस ठाण्याच्या आवारात पडलेल्या तब्बल १९० वाहनांच्या मुळ मालकांचा शोध लावला आहे. मा. श्री अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी देखिल अशा बेवारस वाहनांच्या मुळ मालकांचा शोध लावण्याबाबतचे आदेश आयुक्तालयातील सर्व प्रभारी अधिकारी यांना देण्यात आले होते.

### ❖ कसा शोधला जातो मुळ मालक:-

सुरवातीला वाहनांचे चॅसी नंबर, इंजिन नंबर यांची यादी केली जाते. त्यानंतर वाहनाची विभागणी केली जाते बेवारस, अपघात आणि गुन्ह्यातील अशा वाहनांच्या मुळ मालकांचा घरचा पत्ता शोधुन त्या मालकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जातो. अनेकदा वाहन मालकांचा जुना पत्ता रजिस्टर नोंद

असल्याने मालक त्या पत्यावर मिळुन येत नाही त्यामुळे नविन पत्ता शोधतांना अडचनी निर्माण होतात. वाहनांची बारकाईने माहीती गोळा करुन मुळ मालकांपर्यंत पोहोचने शक्य होत असल्याचे श्री राम उदावंत सांगतात

## ❖ केवळ ०६ दिवसात १९० वाहन मालकांचा शोध :-

चिंचवड पोलीस आणि मावळ पंधरवडीचे श्री राम उदावंत यांनी केवळ ०६ दिवसात, १९० वाहनांच्या मालकांचा शोध लावला आहे. अनेक वाहने सुस्थीतीत असल्याने किरकोळ खर्च आणि दुरुस्ती करुन ही वाहने पुन्हा वापरात आणता येतात. त्यामुळे वाढत्या माहागाईच्या जमाण्यात अशा वाहन मालकांना एक प्रकारे दिलासा देण्याचे काम चिंचवड पोलीस आणि मावळ परंदवाडीचे श्री राम उदावंत यांनी केले आहे.

## ❖ वाहन मालकांनी १५ दिवसात वाहने घेवुन जावीत :-

शोध लागलेल्या वाहनांची यादी पोलीस ठाण्यात लावलेली आहे.अशा वाहन मालकांनी आपल्याकडील आवश्यक कागदपत्रे पोलीस ठाण्यात सादर करुन आपले वाहन १५ दिवसांच्या आत ताब्यात घ्यावीत. दिलेल्या मुदतीमध्ये वाहन मालकांनी वाहन ताब्यात घेतले नाही तर सदर वाहन हे बेवारस असल्याचे ग्राह्य धरुन पुढील कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन न्यायालयीन आदेशानुसार अशा वाहनांचा लिलाव करुन त्याची रक्कम सरकारी तिजोरीत भरण्यात येणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री कृष्णदेव खराडे यांनी सांगितले आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ. संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री मंचक इप्पर सो, पोलीस उप आयुक्त,परि १, मा. डॉ. सागर कवडे सो, सहा.पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री कृष्णदेव खराडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री प्रकाश जाधव पोलीस निरिक्षक (गुन्हे), मुद्देमाल कारकुन पोहवा/६८३ आल्हाट, मपोहवा १००६ भरगुडे, सपोफौ जगताप, मपोना १६३०/खोमणे, मपोना/१०८७ सुतार, पोशि/१९८० पाटील, पोशि/२६१५ भदाने, तसेच मावळ परंदवाडीचे श्री राम उदावंत, बाबासाहेब बागडे, संजय काळे, भारत वाघ आदी पदाधिकारी यांनी हा अभिनव उपक्रम राबविला आहे.

( श्री मंचक इप्पर )
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-१ पिंपरी चिंचवड